लोकमत

भारतातील पहिली उपचारपद्धती, एक पुरुष, एका महिलेवर शस्त्रक्रिया

# हाडांची झीज झाल्यामुळे होणाऱ्या आजारावर बोन सेल थेरपी

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे** : खुब्याच्या हाडांची झीज झाल्यामुळे अव्हॅस्क्युलर नेक्रोसिस हा आजार होतो. या आजाराने त्रस्त असलेल्या रुग्णांवर भारतातील पहिली बोन सेल थेरपी पुण्यात यशस्वी पद्धतीने पार पडली. अव्हॅस्क्युलर नेक्रोसिस या आजारवर करण्यात येणारी ऑसग्रो ही पेशींवर आधारित उपचार पद्धती आहे. ही उपचारपद्धती सर्वप्रथम पुण्यातील ५७ वर्षीय पुरुष व ३६ वर्षीय महिलेवर करण्यात आली. डॉ. आशिष अरबाट यांनी शस्त्रक्रिया यशस्वीरीत्या पार पाडली.



अव्हॅस्क्युलर नेक्रोसिसची सुरुवात प्रामुख्याने व्यसन, चुकीची औषध पद्धती, हाडांची झीज झाल्यामुळे होते. ऑसग्रोसाठीची शस्त्रक्रिया अस्थिप्रत्यारोपण शस्त्रक्रियेच्या तुलनेने स्वस्त आणि वेदनारहित आहे. एक्स-रे, एमआरआय अशा चाचण्या केल्यानंतर उपचारपद्धतीची दिशा ठरवली जाते.

नोव्हेंबर २०२० मध्ये सर्वात प्रथम कोपरगाव येथील ५० वर्षीय हेमंत बदादे हे नितंबांच्या सांध्याची स्थिती बिकट झाल्यामुळे एका खासगी हॉस्पिटलध्ये आले होते. वेदना तीव्र झाल्यामुळे दैनंदिन कामे करणेही अशक्य झाले होते. त्यामुळे त्यांना तत्काळ वैद्यकीय उपचार घेण्याची आवश्यकता होती. त्यांच्या दोन्ही नितंबांना एव्हीएन (अव्हॅस्क्युलर नेक्रोसिस) हा आजार झाल्याचे निदान झाले. डिसेंबर २०२१ मध्ये रुग्णाच्या डाव्या बाजूकडील नितंबावर ड्युअल मोबिलिटी सांधे प्रत्यारोपण शस्त्रक्रिया करण्यात आली आणि त्याच वेळी त्यांच्या उजव्या नितंबावर बोन सेल थेरपी ऑसग्रो पद्धतीने पहिल्या टप्प्यावरील शस्त्रक्रिया करण्यात आली.

> बोन सेल थेरपीत पेशी काढून प्रयोगशाळेत त्यांच्यावर प्रक्रिया केली जाते आणि त्या सक्रिय केल्या जातात. जवळपास ४ मिलियनपासून १०० मिलियन पेशी तयार होतात. ही प्रक्रिया ४ ते ५ आठवड्यांची असते. बोन सेल थेरपीबद्दल अद्याप पुरेशी जनजागृती झालेली नाही. रुग्णांची स्थिती पाहून त्यानुसार बोन सेल थेरपी करायची की, रिप्लेसमेंट सर्जरी करायची, याचा निर्णय घेतला जातो.
>
> **- डॉ. आशिष अरबाट**